अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अतिमआवि /3808
दिनांक : ०६.०१.२०२१

# कार्यालयीन परिपत्रक

विषय : कोव्हीड – १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत खरेदी केलेल्या साहित्य / सामग्री बाबत सद्यस्थिती अहवाल सादर करणेबाबत.

कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत अत्यावश्यक साहित्य / सामग्री विविध खात्यांमार्फत महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३क) अन्वये मा.महापालिका आयुक्त यांना असलेल्या विशेषाधिकारात किंवा कोटेशन / निविदा प्रक्रियेच्या व बचत गटांच्या माध्यमातून खरेदी करण्यात आलेली आहे. याशिवाय विविध आस्थापनांनी त्यांचे CSR फंडातून तसेच विविध खाजगी संस्था, स्वयंसेवी संस्था, देणगीदार यांनी देखील पुणे महानगरपालिकेला विविध प्रकारचे साहित्य / सामग्री उपलब्ध करून दिलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये कोव्हीड-१९ संसर्ग पुरेसा नियंत्रणात आलेला असल्याने पुणे महानगरपालिकेकडून कार्यरत असलेली विविध कामगार निवारा केंद्र, Institutional Quarantine Centers, Covid Care Centers, Dedicated Covid Heaith Center अंशतः अथवा पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहेत. अशा परिस्थितीत उपरोक्त विविध मार्गाने उपलब्ध झालेले साहित्य / सामग्री ज्यांचा पुनर्वापर शक्य आहे अशा सर्व साहित्य / सामग्रीची संभाव्य कोव्हीड संसर्गाच्या वेळी अल्प कालावधीत वापर करता येण्याच्या दृष्टीने उचित प्रकारे जपणूक व साठवणूक करणे अत्यावश्यक आहे.

तरी आपणाकडे उपरोक्त विविध मार्गांनी वेळोवेळी उपलब्ध झालेल्या सर्व साहित्य / सामग्रीची वर्गवारीनुसार एकवट यादी तयार करून सदर साहित्य / सामग्री उचित पद्धतीने सुस्थितीत जपणूक करणे व साठवून ठेवणेचेकामी आणि त्याचे देखरेखीसाठी आपलेकडील जबाबदार अधिकारी / कर्मचाऱ्याची नियुक्ती करावी.

उपरोक्त पुनर्वापरासाठी उपलब्ध सर्व साहित्य / सामग्रीची तपशीलवार यादीसह (आकार, प्रकार, परिमाण इत्यादी तपशिलासह) तसेच नियुक्त जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचे तपशिलासह अहवाल निम्न स्वाक्षरीकर्ता आणि उप आयुक्त (भांडार) यांजकडे दि.१२.०१.२०२१ पर्यंत सादर करावा.

6/1/21.
(सुरेश जगताप)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

प्रतिलिपी

मा.महापालिका आयुक्त
मा.अति.महा.आयुक्त ( ज / ई )

यांजकडेस माहितीसाठी ..

प्रत

- आरोग्य प्रमुख
- मुख्य अभियंता-विद्युत
- अधीक्षक अभियंता (भवन)
- उप आयुक्त (भांडार)
- उप आयुक्त (परिमंडळ क्र १ ते ५)
- सर्व महा.सहा.आयुक्त

यांना माहिती व कार्यवाहीसाठी